**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**जनसंपर्क विभाग- निविदा सूचना**

.............................................................................................................................................

नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांचे, प्रकल्पांचे, सोयीसुविधांची व इतर सकारात्मक माहिती ई न्युज लेटर द्वारे जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मराठी ई-न्युज लेटरची निर्मीती करणेकामी अनुभवी व्यावसायिक/एजन्सी यांचेकडून टु बिड पध्दतीने निविदेद्वारे स्पर्धात्मक देकार मागविण्यात येत आहेत.

इच्छुकांनी सविस्तर माहितीसाठी www.nashikcorporation.in संकेतस्थळावर भेट द्यावी. सदरची निविदा दिनांक ०९/०९/२०१६ ते दिनांक २०/०९/२०१६ रोजी दुपारी १:०० वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळुन) सादर करणे आवश्यक राहील.

सही/-
**उपआयुक्त(स्था.सं.क.)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

## नाशिक महानगरपालिका, नाशिक
## जनसंपर्क विभाग
## तपशिलवार निविदा सूचना (मराठी ई न्युज लेटर)

**१ अ) कामाचे नांव :**

नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांचे सोयी सुविधांचे व इतर सकारात्मक माहिती ई न्युज लेटरद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहचविणेसाठी (मराठी ई न्युज लेटरची निर्मीती करणे.

**१ ब) निविदापुर्व अर्हता :**

१) मराठी ई न्युज लेटर अथवा तशा स्वरुपाचे काम केलेबाबतचा किमान १ वर्षाचा अनुभवाचा दाखला/पुरावा निविदा सोबत जोडणे आवश्यक राहील.

२) क्वॉलिफिकेशन – पत्रकारीता पदविका अथवा पदवी. अथवा वृत्तपत्र संपादक अथवा डि.टी.पी. कोर्स

**१ क) करावयाच्या कामाचा सविस्तर तपशिल व स्वरुप.**

| निविदा बाब क्र. | तपशिल | अंदाजे संख्या |
|---|---|---|
| ०१ | इलेक्ट्रॉनिक्स मिडिया च्या माध्यमातुन महानगरपालिकेच्या योजनांची, प्रकल्पांची, सोयी सुविधांची व इतर सकारत्मक माहिती जनमानसापर्यंत पोहचविणेसाठी आकर्षक, वस्तुनिष्ठ, प्रतिभाशाली मराठी ई न्युज लेटरची दरमहा निर्मीती करणेबाबत.<br>साईज - मॅगझिन साईज, पाने – किमान ४ पाने. | दरमहा एक या प्रमाणे एका वर्षात बारा आवृत्या प्रकाशित करणे. |

**कामकाजाचे स्वरुप व कार्यपध्दती :-**

१) मराठी ई-न्युज लेटर दरमहा विहीत मुदतीत प्रकाशित करणे आवश्यक राहील. प्रसंगानूसार एखाद्या महिन्यात एका पेक्षा जास्त मराठी ई-न्युज लेटरची निर्मिती करणे गरजेचे वाटल्यास त्यासाठी वेगळा चार्ज दिला जाणार नाही.

२) मराठी ई-न्युज लेटरसाठी लागणारी माहिती/फोटोग्राफस् मनपाच्या विविध खात्यांकडून संकलित करणे अथवा इतर ठिकाणाहून संकलित करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३) मराठी ई-न्युज लेटरचा मसुदा तयार झालेनंतर मा. आयुक्त सो., अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचे मान्यतेनंतरच मराठी ई-न्युज लेटर प्रकाशित करणे आवश्यक आहे. अशी मान्यता घेतलेशिवाय मराठी ई-न्युज लेटर प्रकाशित केल्यास त्याबाबतची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

४) विविध खात्याकडून प्राप्त झालेली माहीती व फोटो ग्राफस आदिंची व्यवस्थीत व आकर्षक पध्दतीने मांडणी करणे(डिटीपी करणे) या कौशल्यपुर्ण व प्रतीभा संपन्न कामकाजाचा अंतर्भाव राहील.

**१ ड) कामाचे अंदाजे प्राकलन** :रक्कम रुपये १,६८,०००/-

**२) सेवा पुरविण्याचे ठिकाण व पध्दती :**

निविदेत नमूद केलेली सेवा/काम जनसंपर्क विभागाने दिलेल्या लेखी कार्यादेशात नमूद केलेल्या कार्यपध्दती प्रमाणे करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

**३) निविदा बयाणा रक्कम व कोऱ्या निविदा पत्रकाची किंमत भरणेबाबत. :**

अ) सदर निविदेपोटी निविदा बयाणा रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रक्कम पाच हजार मात्र) नामनपा खजिना विभाग, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक येथे विहित मुदतीत रोख भरावी. निविदा अंतिम झाल्यानंतरच ज्या निविदा नामंजूर होतील त्यांची निविदा बयाणा रक्कम मागणी केल्यानंतर परत करण्यात येईल. यशस्वी निविदाधारकाची निविदा बयाणा रक्कम उक्त कराराची मुदत पुर्ण झालेनंतर परत करणेत येईल.

ब) सदर कामाच्या कोऱ्या निविदापत्रकाची किंमत (नापरतावा) रक्कम रुपये १,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक हजार नव्वद मात्र) नामनपा खजिना विभाग, राजीव गांधी भवन, शरणपुर

रोड, नाशिक येथे विहित मुदतीत रोख भरल्यानंतर त्या पावतीनुसार कोरे निविदापत्रक मनपा जनसंपर्क अधिकारी, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक यांचे कार्यालयात मिळतील.

४) **सुरक्षा अनामत** :

अ) ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर करण्यात येईल. त्या प्राकलन रक्कमेच्या ५ टक्के सुरक्षा अनामत पुरवठा आदेशापुर्वी नाशिक महानगरपालिका खजिन्यात रोख भरावी लागेल. अथवा उक्त कामाचे देयकांतुन कपात करुन घेण्यात येईल. मालाचा पुरवठा झालेनंतर सहा महिन्यांनी किंवा प्रयोजनाचा हेतु पुर्ण झाले नंतर कामाबाबत/मालाचे गुणवत्तेबाबत तक्रारी नसलेस मागणीनूसार सदरची सुरक्षा अनामत परत करण्यात येईल.

ब) कामाचे स्वरुप/पुरवठयाचे स्वरुप विचारात घेता अतिरिक्त सुरक्षा अनामत घेणे महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यास त्याप्रमाणे अतिरिक्त सुरक्षा अनामत महानगरपालिकेकडेस भरणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

५) **सेवा पुरविण्याची व पुरवठा करण्याची मुदत व इतर तपशिल** :

कार्योदेशात नमुद कालावधीत कामाची पुर्तता करणे तसेच सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

६) **निविदा देकाराचा वैधता कालावधी** :

सदर निविदेची (बीड) मुदत निविदा सादर केलेपासून ९० दिवसापर्यंत राहील. तथापी मुदतवाढ देणे आवश्यक असल्यास मा. अतिरिक्त आयुक्त-१, मनपा नाशिक हे सदरची मुदतवाढ देण्यास सक्षम प्राधिकारी राहतील.

७) **निविदा सादरीकरणाचे व प्रि-बीड मिटींगसह इतर कार्यवाहीचे वेळापत्रक** :

अ) तपशिलवार निविदा नोटीस प्रसिध्दी दि.०९/०९/२०१६.

ब) कोऱ्या निविदापत्रकाची विक्रीची व निविदा बयाणा रक्कम भरणेची मुदतदि.०९/०९/२०१६ ते दि.१९/०९/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजेपावेतो राहील.

क) दि.१४/०९/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त-१ अथवा उपआयुक्त(स्था.सं.क.) यांचे कार्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक येथे प्रि-बीड मिटींग ठेवण्यात येईल. सदर मिटींगला सर्व संबंधीतास उपस्थित राहता येईल. प्रि-बीड मिटींगमध्ये महानगरपालिकेने मान्य केलेल्या मुद्यांचा तपशिल उक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर प्रि-बीड मिटींगचे मुद्दे सर्व संबंधीत निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

ड) मोहरबंद निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. २०/०९ /२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपावेतो राहील.

**ई) निविदा सादर करणेचे ठिकाण** :

उपआयुक्त(स्था.सं.क.) यांचे कार्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक येथे विहित मुदतीत मोहरबंद निविदा स्विकारणेत येतील. मुदतीनंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही.

**फ) मोहरबंद निविदा उघडण्याचे ठिकाण व वेळ** :

स्विकारार्ह निविदा शक्य झाल्यास दिनांक २०/०९/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता उपआयुक्त(स्था.सं.क.) यांचे कार्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक येथे उघडण्यात येतील त्यावेळेस संबंधीत निविदाधारकास उपस्थित राहता येईल.

८) **निविदा देकार रद्द करणे** :

सदर निविदेतील नमुद अटीशर्ती व अर्हता पुर्ण करु न शकलेल्या निविदाधारकांच्या व्यापारी निविदा न उघडता रद्द करण्यात येतील. तसेच सशर्त निविदा तात्काळ रद्द करणेत येतील.

## ९) **निविदा सादर करण्याची पध्दती** : (टु बीड सिस्टीम)

**अ) निविदा पाकिट क्रं. — १** (तांत्रिक निविदा/टेक्नीकल बीड)

या पाकिटा मध्ये खाली नमूद केलेले पुरावे/दाखले प्रमाणित करुन सिलबंद करावेत या पाकीटावर **'तांत्रिक निविदा'** असे नमुद करावे. या पाकीटात दरपत्रके ठेवु नयेत. या पाकीटात दरपत्रके ठेवल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही.

१) निविदा बयाणा रक्कम भरलेची पावती.

२) अशा स्वरुपाचे काम केले असलेबाबतचा १ वर्षाचा अनुभवाचा दाखला/पुरावा.

३) (मराठी ईन्युज लेटरचा नमुना तयार करुन त्याची न्युज प्रिंट सोबत जोडावी.

४) निविदा सर्वसाधारण अटीशर्ती तसेच इतर अटीशर्ती मान्य असलेबाबत सही शिक्क्यानिशी निविदा सर्वसाधारण अटीशर्तीचा फॉर्म.

**ब) पाकीट क्रं.२--** व्यापारी निविदा/कमर्शिअल बीड

निविदापत्रकात सही शिक्क्यानिशी दर नमुद करुन ते मुळ निविदा पत्रक या पाकिटात ठेवून मोहोरबंद करावे. त्या पाकिटावर **व्यापारी निविदा/कमर्शिअल बीड** असे नमुद करावे.

**क) पाकीट क्रं.३--** या पाकिटात वरील प्रमाणे पाकिट क्र.१ (तांत्रिक निविदा) आणि पाकिट क्र.२ (व्यापारी निविदा) ही दोन्ही पाकिटे ठेऊन ते पाकिट क्रं. ३ सिलबंद करावे. आणि त्यावर कामाचे नांव स्पष्टपणे नमुद करावे.

## १०) **निविदा उघडण्याची पध्दती :**

अ) प्रथम निविदा पाकिट क्रमांक-१ (तांत्रिक निविदा) उघडण्यात येतील. त्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता निविदाधारकाने केलेली आहे, अशी खात्री झाली तरच निविदा पाकिट क्र-२ (व्यापारी निविदा) उघडण्यात येईल. अन्यथा त्या निविदाधारकाची निविदा रद्द समजण्यात येईल.

ब) निविदा धारकाची निविदे सोबतची कोणतीही अट मान्य करण्यात येणार नाही. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येईल.

## ११) **करारनामा करणे :**

अ) ज्या निविदाधारकाची संपुर्ण अथवा भागशः निविदा मंजूर होईल. त्या निविदाधारकास प्राकलनाची रक्कम विचारात घेऊन योग्य त्या स्टॅम्प पेपरवर मनपाचे लाभात रितसर करारनामा करुन द्यावा लागेल व दोन सक्षम जामिनदार द्यावे लागतील.

ब) सदरच्या निविदेची मुदत/कालावधी वैध आहे तोपर्यंत त्या दराने पुरवठा करणे/काम करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

## १२) **निविदा देकारांमध्ये सर्व करासह व वाहतुक खर्चासह दर नमूद असणे :**

अ) सेल/सर्व्हीस टॅक्स, वाहतुक खर्च व इतर सर्व अनुषंगिक करासह निविदेतील दर नमूद करावयाचे आहे. इतर कोणत्याही टॅक्सची किंवा इतर कोणत्याही खर्चाची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही. नाशिक महानगरपालिकेने सदर निविदा दरातील मालाची/सेवेची मुळ किंमत, दर, इतर कर, वाहतुक व इतर खर्च वैगेरे बाबींच्या संपुर्ण तपशिलाची मागणी केल्यास तसा सविस्तर खुलासा सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

ब) निविदा मंजूर झाल्यानंतर सदरचे सेवेचे दरात, मालाचे दरात / कामाचे दरात दरवाढ झाल्यास दरवाढ झालेल्या दराने निविदाधारकास जादा रक्कम मागता येणार नाही.

## १३) **विलंब आकार :**

मुदतीत साहित्याचा पुरवठा/काम न केल्यास उशिरा प्राप्त झालेल्या मालावर/सेवेवर दर हजारी दर दिवसाला र.रु.१/- याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

## १४) सेवेचा/मालाचा पुरवठा मुदतीत न झाल्यास इतर पध्दतीने खरेदी करणे :

मुदतीत मालाचा पुरवठा/काम न केल्यास सदरचा माल/काम निविदाधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहून खरेदी करण्यात येईल/काम करुन घेण्यात येईल आणि अशा प्रकरणी महानगरपालिकेस मंजूर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

## १५) टेंडर स्पेशिफिकेशनप्रमाणे मालाचा पुरवठा न झाल्यास/सेवा न पुरविल्यास :

मंजूर नमुन्याप्रमाणे/टेंडर स्पेशिफिकेशनप्रमाणे मालावर पुरवठा न झाल्यास/काम न केल्यास सदरचा माल परत करण्यात येईल/काम नाकारण्यात येईल. याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

## १६) निविदाधारकाकडून काम करुन घेणे महानगरपालिकेवर बंधनकारक नसणे :

कोणताही माल/काम मंजूर केलेल्या दराने निविदाधारकाकडूनच खरेदी करणे / काम करुन घेणे महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही व याबाबत निविदाधारकास काहीही भरपाई मागता येणार नाही.

## १७) निविदेत दर नमूद केलेल्या तपशिलाप्रमाणे साहित्याचा पुरवठा केलेबाबत तसेच सेवा पुरविलेबाबतच सक्षम प्राधिकारी/जनसंपर्क अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

## १८) सेवा पुरविलेबाबतचे तसेच पुरवठा झालेल्या मालाचे देयक अदा करणे :

पुरवठा झालेला माल स्पेशिफिकेशनप्रमाणे असलेबाबत तसेच केलेले काम,पुरविलेली सेवा स्पेसीफिकेशन प्रमाणे व गुणवत्ते प्रमाणे असल्याची खात्री झालेनंतर पेमेंट अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल. काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करण्यास उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

## १९) विशेष तरतुद :

अ) महानगरपालिकेचे हितार्थ कोणतेही जादा अट समावेश करण्याचा अधिकार मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचा राहील.

ब) कोणत्याही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार मा.अति.आयुक्त सो.,मनपा नाशिक यांचेकडे राहतील.

**सही/-**

**उपआयुक्त(स्था.सं.क.)**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

वरीलप्रमाणे अटीशर्ती मी / आम्ही वाचल्या असून आम्हास त्या अटीशर्ती मान्य व कबूल आहेत त्यासाठी या अटीशर्ती नमुन्यावर स्वाक्षरी करीत आहे. तसेच माझ्या/आमच्या फर्मचा तपशिल खालीलप्रमाणे देत आहोत. तसेच असेही जाहिर करतो की, कोणत्याही प्राधिकरणाने आमचे फर्मचे नाव काळया यादीत टाकलेले नाही किंवा आमचे फर्मवर बंदी घातलेली नाही असे सत्य प्रतिज्ञेवर कथन करत आहे.

१) निविदाधारक फर्मचे संपुर्ण नांव व पत्ता : ------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------------

२) मालकाचे/संचालकाचे नांव : ------------------------------------------------------------

३) ज्या व्यक्तीशी संपर्क करावयाचा आहे,

अशा माहिगार इसमाचे नांव व फोन क्र. : ------------------------------------------------------

ठिकाण :

दिनांक : / /२०१६ **निविदाधारकाचा सही व शिक्का**

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

## जनसंपर्क विभाग

## निविदा पत्रक-२०१६ ई-न्युज लेटर (मराठी)

**कामाचे नांव** :नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांची, प्रकल्पांची सोयी-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून ई-न्युज लेटरद्धारे जनमाणसापर्यंत पोहोचविण्यासाठी मराठी ई-न्युज लेटरची निर्मिती करणेबाबत.

**कामाची मुदत** : एक वर्ष.

**निविदा पत्रक सादर करण्याची अंतिम मुदत** : दिनांक २०/०९/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत.

**कोटेशनधारकाचे नांव व पत्ता** : ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

**संपर्क क्रमांक** :

नाशिक महानगरपालिकेच्या विविध प्रकारच्या योजनांची, प्रकल्पांची सोयी-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून ई-न्युज लेटरद्धारे जनमाणसापर्यंत पोहोचविण्यासाठी मराठी ई-न्युज लेटरची निर्मिती करणेकामी मी/आम्ही खालीलप्रमाणे दर देत आहोत.

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति लेटर किंवा दरमहा (सर्व करासह) |
|---|---|---|
| १) | इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या माध्यमातून महानगरपालिच्या योजनांची, प्रकल्पांची, सोइ-सुविधांची व इतर सकारात्मक माहिती जनमाणसांपर्यंत पोहोचविण्यासाठी आकर्षक, वस्तूनिष्ठ, प्रतिभाशाली, मराठी ई-न्युज लेटरची दरमहा निर्मिती करणेबाबत.<br>साईज - मॅगझीन साईज<br>पाने – किमान ४ पाने | |

वरीलप्रमाणे मराठी ई-न्युज लेटर तयार करण्याचे काम करण्याची माझी तयारी असून त्यासाठी मी/आम्ही हे निविदा दर सादर करीत आहे. निविदा सोबतच्या अटीशर्ती मला मान्य व कबूल असून त्यासाठी उक्त अटीशर्तीवर व सदरचे दरपत्रकावर स्वाक्षरी करीत आहे.

तरी मा. उपआयुक्त(स्था.सं.क.) सो., नाशिक मनपा यांचेकडेस विनंती की, सदरच्या दराचा विचार करुन मला सदरचे काम करण्याची संधी द्यावी ही विनंती.

ठिकाण :

दिनांक : /०८/२०१६

**निविदा धारकाची सही व शिक्का**